// www.kolhapurpolice.gov.in **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणा-या क्रेन करार जाहिरात** //

शहर वाहतूक नियंत्रण शाखा,कोल्हापूर व इचलकरंजी ठाणे करीता वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारी दुचाकी, चारचाकी वाहने, अपघातग्रस्त / रस्त्यावर बंद पडलेली मोटार वाहने वगैरे वाहनांवर कारवाई व उचलणेकरीता शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार व खालील अटी व शर्तीवर वार्षिक करार पध्दतीने क्रेनची आवश्यकता आहे.

१. क्रेनवर एकच चालक राहिल. एखादया अपरिहार्य कारणास्तव दोन चालकांसाठी परवानगी देण्यात येईल.

२. चालकास गाडी चालविण्याचा अनुभव तीन वर्षे असावा. त्यांचेकडे एल.एम.व्ही./ एम.एम.व्ही./ मालवाहतूक विहित मुदतीतील वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे. क्रेनवरील चालक व गाडया उचलणारे कर्मचारी यांना एक सारखा निळया रंगाचा निटनेटका गणवेश असावा. तसेच कर्मचा-यांचे फोटो ,संपूर्ण माहिती ते राहत असलेल्या स्थानिक पोलीस ठाणेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून वाहतूक शाखेस सादर करावा.

३. वाहन मालकाने क्रेन वरील कर्मचा-यांना पोलीस निरीक्षक, वाहतूक नियंत्रय शाखा यांचे प्रतिस्वाक्षरीचे विहित नमुन्यात ओळखपत्र पुरविणे आवश्यक आहे. क्रेन कर्मचा-यांना रात्रीचे वेळी स्वयंत्रकाशीत जॅकेट क्रेन व्यावसायीक यांनी पुरवावे.

४. क्रेन सुस्थितीत असल्याबाबतची कागदपत्रे अद्यावत नोंदीसह आर.टी.ओ. कार्यालय,कोल्हापूर यांचे कडे सादरकरणे आवश्यक आहे. ( उदा. रजिस्ट्रेशन, पीयुसी, इन्शुरंन्स, फिटनेस प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे ) क्रेन व्यवसायासाठी लागणारे सर्व परवाने / मंजूरी घेणेची कार्यवाही क्रेन मालक यांनी स्वत: करावयाची आहे. तसेच आयकर संदर्भातआयकर रिटर्न भरलेबाबत विवनण पत्र सादर करावे. क्रेन वाहनांचे दिवे ( पार्किंग लाईट, टेल लाईट इ. ) व लाऊड स्पिकर ,माईक,सायरन इ. सुस्थितीत असावेत क्रेनवर सीसी कॅमेरे बसविणे बंधनकारक आहे. तसेच सीसी टिव्हीचा बॅकअप सात दिवसांचा राहिल.

५. वाहतूक नियंत्रण शाखेच्या शहरातील एक विभागातून दूस-या विभागाकडे क्रेन पाळीप्रमाणे काम करीत राहील. तसेच पोलीस निरीक्षक/ पोलीस उप निरीक्षक हे जो विभाग/ रस्ता सांगतील त्या ठिकाणी क्रेन पाठवावी लागेल.

६. क्रेन मध्ये कोणताही तांत्रिक बिघाड असता कामा नये. क्रेन तांत्रिकदृष्ट्या साक्षम असणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्याला क्रेनची तपासणी करून घेण्यात यावी. याबाबत पोलीस उप अधीक्षक हे क्रेनची अचानक तपासण करतील.

७. क्रेन बिघाड व क्रेनवरील स्थगिती ही आठ दिवयापेक्षा जास्त कालावधीची असता कामा नये. ज्या वेळी क्रेनची आवश्यता असेल त्यावेळी क्रेनची मागणी केली असता क्रेन तात्काळ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. क्रेन कर्तव्यावर रुजू होण्याआधी ONPOLICE DUTY या नावाचा फलक क्रेनच्या दर्शनी भागावर असावा व पोलीस कर्तव्याशिवाय इतर वेळी तो फलक वाहतूक शाखेत काढून ठेवावा.

८. क्रेन सकाळी ०९.०० वाजलेपासून रात्री २१.०० वाजेपर्यंत वाहतूक नियंत्रण शाखेकडे काम करेल. तद्नंतर सदरचे वाहन हे आपत्कालीन सेवेसाठी वाहतूक नियंत्रण शाखेकडे राखीव राहिल.

९. क्रेन कर्तव्यास असलेल्या पोलीस अंमलदार यांचे आदेशाशिवाय कोणतेही वाहन उचलू नये अथवा उचलेले वाहन परस्पर पैसे घेवून सोडू नये.

१०. क्रेन मालकांनी संबंधीत वाहन चालकास देत असलेल्या पावतीबाबत पावती पुस्तक पोलीस अधीक्षक, कार्यालयाकडून साक्षांकीत करून घेणे आवश्यक आहे. क्रेन पावतीवर निवासस्थानाचा / कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक, वाहन मालक / चालकाचे नाव व पत्ता संपूर्णपणे लिहीलेला असावा. इत्यादी माहिती सविस्तर नमुद असावी.

११. अतितात्काळ प्रसंगासाठी क्रेनची आवश्यकता भासल्यास रात्रीचे वेळी कर्तव्य बजावण्यास क्रेन पाळीप्रमाणे रात्रपाळीसाठी वापरण्यात येईल.

१२. क्रेनकडून रोजच्या रोज उचलण्यात आलेल्या वाहनांचे नियमानुसार ठरवून दिलेले भाडे संबंधीत वाहन चालकाकडून रितसर वसुल करून देणेची आहे. वाहने उचलण्यासाठी वाहतूक शाखा / शासनकडून क्रेनसाठी वेगळे मासिक / दैनिक कोणतेही भाडे देण्यात येणार नाही.

१३. पावतीवरील रकाने अर्धवट न सोडता संपुर्णपणे भरावेत. वाहन उचलेणेपुर्वीच नमुद वाहनाचे नुकसान झालेचे दिसून आलेस फोटो घेवून तशा पावतीवर नोंदी कराव्यात. तसेच प्रत्येक वाहन उचलण्यापुर्वी प्रत्येक वाहनाचा सुस्पष्ट फोटो काढण्यात यावा. याबाबतची पुर्तता व सुविधा क्रेन मालकांनी करावयाची आहे.

१४. क्रेन चालकाव्यतीरीक्त क्रेनवर तीन कर्मचारी ठेवण्यात यावेत. कर्मचा-यांची नागरीकांशी वर्तणूक सौजन्याची राहीत याची दक्षता क्रेन मालक घेतील. गैरवर्तणूकीच्या कारणामुळे काढले असले अशा कर्मचा-यास पुन्हा या कार्यालयाचे परवानगीशिवाय कामावर घेता येणार नाही.

१५. क्रेनवर काम करणा-या कर्मचा-यांचा पगार हा क्रेन मालकाने द्यावयाचा असून शहर वाहतूक शाखा अथवा शासनाकडून त्यांना पगार देण्यात येणार नाही. क्रेन चालक हा क्रेन वापरात तज्ञ असावा. क्रेन वाहनाचा संपर्ण देखभाल खर्च हा क्रेन मालक यांनी करावयाचा आहे. त्याबाबत शहर वाहतूक शाखा अथवा शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत अगर तरतूद करण्यात येणार नाही.

१६. क्रेन वाहन अचानक नादूरूस्त झाल्यास व दुरूस्तीसाठी बंद ठेवायचे असल्यास क्रेन मालक यांनी कार्यालयास लेखी स्वरूपात आगावू कळवून कार्यालयाचे परवानगीने पर्यायी सुस्थितीतील क्रेनची सर्व कागदपत्रांसह व्यवस्था करावयाची आहे. क्रेन वाहनाची मागणी केल्यानंतर ते उशीरा पोहोचल्यास तसेच ठरवून दिलेल्या अटींचा व शर्तीचा भंग केल्यास सदरचा करार केंव्हीही रद्द करण्याचा अधिकार शहर नियंत्रय शाखा / पोलीस अधीक्षक कार्यालयास राहिल.

१७. क्रेन मालकांनी आपले वाहन वाहतूक शाखेच्या परवानगी शिवाय परस्पर इतरांना भाडयाने दिल्या अथवा विक्री केल्यास सादर बाबतचा करार कायमस्वरूपी खंडीत करण्यात येईल.

१८. दुचाकी वाहन उचलल्यानंतर ते वाहून नेताना दोन वाहनांचे परस्पर घर्षन होणार नाही व त्यामुळे वाहनांचे नुकसान होणार नाही यासाटी योग्य ती दक्षता घ्यावी किंवा रबरी पॅडींगचा वापर करावा.

१९. उचललेल्या वाहनाचे नुकसान झाल्यास संबंधित नुकसानीची जबाबदारी संबंधित क्रेन व्यावसायिकाची राहील तसेच त्या संदर्भात वाहन चाकांची पावतीवर सही घेण्यात यावी.

२०. व्ही. आय.पी. बंदोबस्तासाठी तसेच इतर आकस्मिक तातडीचे कारणासाठी वाहने काढणेकरीता शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडून क्रेनचा वापर केल्यास ते काम विना मोबदला करणेचे आहे. त्याबाबत कोणतेही भाडे अथवा मोबदला देण्यात येणार नाही.

२१. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर क्रेन मालक हे शहर वाहतूक नियंत्रण शाखेला करारातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत स्टॅप पेपरवर करार करून देतील.

तरी वरील अटी व शर्तीवर वार्षीक करार पध्दतीने क्रेन देण्यास इच्छूक क्रेन धारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाचे आत आपले अर्ज क्रेनबाबतची सर्व कागदपत्रे जोडून पोलीस अधीक्षक कार्यालय, कसबा बावडा रोड,कोल्हापूर येथे सादर करावेत.नमुद कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच संबंधित प्राप्त अर्ज / निवीदा पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे उघडण्यात येतील. कोणतीही निविदा / अर्ज स्विकारणे अगर नाकारणे याबाबत पोलीस अधीक्षक हे अंतिम निर्णय घेतील व तो सर्वांना बंधनकारक राहील.

( योगेश कुमार भा.पो.से )
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर